कामगार कल्याण विभाग,
पुणे महानगरपालिका.
जा.क्र.:एलओ/3042
दिनांक : 29/10/2020

– कार्यालयीन परिपत्रक –

विषय :पुणे महानगरपालिकेतील ठेकेदारांकडील कंत्राटी कामगारांना सन २०१९ ते २०२० या आर्थिक वर्षातील बोनस अदा करणेबाबत.

संदर्भ : कार्यालयीन आदेश जा.क्र. मआ/एल.ओ./०१, दि. १/४/२०१६.

पुणे महानगरपालिकेतर्फे विकास प्रकल्पांची कामे व देखभाल दुरुस्ती निविदेव्दारे कंत्राटी कामगारांमार्फत करण्यात येतात अशा कंत्राटी कामांबाबत कंत्राटी कामगार (नियमन व निर्मूलन) अधिनियम,१९७० मधील तरतुदीची परिणामकारक अंमलबजावणीसाठी संदर्भांकित कार्यालयीन आदेश निर्गमित करण्यात आले आहे. त्याअनुषंगाने संबंधित विभागांनी कार्यवाही करणे आवश्यक आहे.

ज्या विभागांनी ठेकेदारांमार्फत कंत्राटी कामगारांची सेवा घेतली आहे अशा कंत्राटी कामगारांना बोनस प्रदान अधिनियम, १९६५ मधील तरतूदीनुसार संबंधित कंत्राटी कामगारांचे मुळ भत्ता + विशेष भत्ता दोन्ही मिळुन २१,०००/- पेक्षा कमी असल्यास व एक वर्षाच्या कालावधीत ३० दिवसांपेक्षा जास्त काम केले असल्यास सदर कंत्राटी कामगारांना बोनस देणे बंधनकारक आहे. त्या अनुषंगाने ज्या विभागांकडून कंत्राटी कामाबाबतची निविदा प्रक्रीया राबविताना सदर कामामध्ये बोनसची रक्कम समाविष्ट करण्यात आली आहे अशा कामावरील कंत्राटी कामगारांना बोनस देणे क्रमप्राप्त आहे. ज्या ठेकेदारांकडून त्यांचेकडील कंत्राटी कामगारांना महिनेमहा वेतनातून बोनस आदा करण्यात येतो त्यांना सदर बाब लागू नाही. तथापि काही ठेकेदारांकडून त्यांचेकडील कामगारांना महिनेमहा वेतनातून बोनस न देता वार्षिक पध्दतीने एकवट स्वरूपात आदा करण्यात येतो. त्या ठेकेदारांनी त्यांचेकडील कामगारांना बोनस देणे अनिवार्य आहे.

तरी, आपल्या विभागाकडील संबंधित ठेकेदारांना **(जे ठेकेदार महिनेमहा वेतनातून बोनस आदा करतात त्यांना वगळून)** त्यांचेकडील कंत्राटी कामगारांना बोनस देणेबाबतची कार्यवाही करणेबाबत सूचित करण्यात यावे. याबाबत काही प्रश्न निर्माण झाल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी संबंधित विभागाची राहिल याची कृपया नोंद घ्यावी.

20-10-2020

(शिवाजी दौंडकर)
मुख्य कामगार अधिकारी,
पुणे महानगरपालिका.

प्रत :
सर्व संबंधित खातेप्रमुख/ महापालिका सहाय्यक आयुक्त,
पुणे महानगरपालिका.
यांचकडेस पुढील कार्यवाहीसाठी रवाना...